# सेवाशक्ती टाईम्स

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा ● वर्ष:- 3 रे ● अंक:- १८८ ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/२०२२/८७८८४ ● बुधवार ०३ सप्टेंबर २०२५



## "जरांगेची मराठा आरक्षणाची मागणी मान्य केली पण..."

## जीआर निघाला, पण एका शब्दाने गेम फिरवला, तो घोळ काय?

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

मुंबई : राज्य सरकारने मनोज जरांगे यांची मराठा आरक्षणाची मागणी मान्य केली आहे. जरांगे यांच्या मागणीनुसार राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच याबाबतचा निर्णयही जारी केला आहे. या निर्णयानंतर आता मराठा समाजाला ओबीसीत प्रवर्गातून आरक्षण मिळण्यास मदत होणार आहे. दरम्यान, राज्य सरकारने जरांगे यांच्या मागणीनुसार जीआर काढला असला तरी जीआरमधील एका शब्दाची विशेष चर्चा होत आहे. या शब्दावर आक्षेप घेतल्यानंतर तो काढण्यात आला आहे. पण हा शब्द असता तर नेमकं काय घडलं? असंत हे जाणून घेऊ या...जरांगे पाटलांनी उपोषण सोडू की नको असा प्रश्न आंदोलकांना विचारला होता. आंदोलकांचा होकार आल्यानंतर जरांगे पाटलांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझं उपोषण सोडवण्यासाठी यावं अशी इच्छा व्यक्त केली. यावेळी विखे पाटलांनी सांगितले की, 'आरक्षणाचा निर्णय घेताना आम्ही सतत मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांच्या संपर्कात होतो. त्यांच्याशी आमची चर्चा झालेली आहे. त्यामुळे तुम्ही उपोषण सोडावं अशी विनंती केली. त्यानंतर जरांगे पाटलांनी उपोषण सोडलं. मात्र यामुळे जरांगे पाटलांची मुख्यमंत्री आणि उपमुख्य मंत्र्यांच्या उपस्थितीत उपोषण सोडण्याची इच्छा मात्र अधुरीच राहिली आहे.सरकारने जारी केलेला हा जीआर हैदराबाद गॅझेटसंदर्भात आहे. जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करणे याकरिता सन 2001 च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. 23 व त्याअंतर्गत कार्यपद्धती निश्चितीकरिता नियम तयार करण्यात आलेले आहेत. यामध्ये हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र मिळण्या साठी चौकशी केली जाईल. त्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यास सहाय्य करण्याच्या दृष्टीने अहवाल देण्यासाठी गावपातळीवर एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत १. ग्राम महसूल अधिकारी, २. ग्रामपंचायत अधि कारी, ३. सहायक कृषी अधि कारी असतील, असे या गॅझेटमध्ये नमूद आहे.मराठा आरक्षणाबाबत सुरु असलेले उपोषण सोडल्यानंतर जरांगे पाटलांच्या डोळ्यात आनंदाश्रू दिसत होते. तसेच त्यांच्या चेहऱ्यावर समाधानही दिसत होते. उपोषण सोडताना जरांगे पाटलांनी मराठा बांधवांना गावाकडे जाताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच मी आता रुग्णालयात जाणार आहे असंही त्यांना सांगितलं. उपोषण सोडल्यानंतर गणपतीची आरतीही करण्यात आली. तसेच मराठा आरक्षण उपसमितीनेही मराठा समाजाचे आभार मानले.

### राज्य सरकारने नेमका कोणता जीआर लागू केला?

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेट लागू करावे अशी मागणी जरांगे यांनी केली होती. जरांगे यांच्या मागणीनुसार राज्य सरकारने तत्काळ हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन निर्णय काढला आहे. तसेच या शासन निर्णयात हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, मराठा कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल. गावपातळीवर गठीत केलेल्या समितीच्या आधारे योग्य तपास केल्यानंतर हे प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

### नेमका कोणत्या शब्दावर आक्षेप?

सरकारने हा जिआर काढताना अगोदर पात्र व्यक्तींना कुणबी, कुणबी मराठा आणि मराठा कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात तरतूद केली होती. मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष हा जीआर घेऊन मनोज जरांगे यांच्याकडे गेले होते. जरांगे यांनी हा जीआर व्यवस्थित वाचला. त्यांनी या जीआरमध्ये पात्र व्यक्ती हा शब्द दिसला. यावरच जरांगे यांनी आक्षेप घेतला. त्यानंतर लगेच राधाकृष्ण विखे पाटील यांनी जीआरमधून पात्र हा शब्द काढून टाकला. हा शब्द जीआरमध्ये कायम राहिला असता तर कदाचित कुणबी प्रमाणपत्र मिळणा-या मराठा व्यक्तींची संख्या कमी झाली असती. पण जरांगे यांनी हा शब्द काढून टाकण्यास सांगितला. या एका आक्षेपामुळे लाभार्थ्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

### जरांगे पाटलांची इच्छा अधुरीच राहिली!

जरांगे पाटलांनी उपोषण सोडू की नको असा प्रश्न आंदोलकांना विचारला होता. आंदोलकांचा होकार आल्यानंतर जरांगे पाटलांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझं उपोषण सोडवण्यासाठी यावं अशी इच्छा व्यक्त केली. यावेळी विखे पाटलांनी सांगितले की, 'आरक्षणाचा निर्णय घेताना आम्ही सतत मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांच्या संपर्कात होतो. त्यांच्याशी आमची चर्चा झालेली आहे. त्यामुळे तुम्ही उपोषण सोडावं अशी विनंती केली. त्यानंतर जरांगे पाटलांनी उपोषण सोडलं. मात्र यामुळे जरांगे पाटलांची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उपोषण सोडण्याची इच्छा मात्र अधुरीच राहिली आहे.


### जरांगे पाटलांच्या डोळ्यात आनंदाश्रू!

मराठा आरक्षणाबाबत सुरु असलेले उपोषण सोडल्यानंतर जरांगे पाटलांच्या डोळ्यात आनंदाश्रू दिसत होते. तसेच त्यांच्या चेह-यावर समाधानही दिसत होते. उपोषण सोडताना जरांगे पाटलांनी मराठा बांधवांना गावाकडे जाताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच मी आता रुग्णालयात जाणार आहे असंही त्यांना सांगितलं. पाच दिवसांच्या या उपोषणानंतर जरांगे पाटलांच्या ब-याच मागण्या मान्य झाल्या आहेत. उपोषण सोडल्यानंतर गणपतीची आरतीही करण्यात आली. तसेच मराठा आरक्षण उपसमितीनेही मराठा समाजाचे आभार मानले.

## बस स्टॉप जवळील विद्युत डीपी घाणीच्या विळख्यात!

## मिनी डीपी, वीज खांबांना वेलींचा विळखा.नागरिकांचा जीव धोक्यात!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**ज्ञानेश्वर गंगावणे.**

खासगाव : वरूड बू येथील सर्किट बॉक्सची तुटलेली झाकणे, त्यातील बाहेर डोकावणारी वायरिंग, लोंब कळणाऱ्या वायरी, कित्येक डीपींची उघडी झाकणेही, वीज खांबांवर झुडपी वेलींचा विळखा,आणि त्या ठिकाणी असलेली भलीमोठी घाण असे चित्र जाफराबाद तालुक्या तील वरूड बु येथील बस स्टॉप च्या पाठीमागील विद्युत डीपी जवळ सध्या दिसून येत आहे . या घाणीमुळे नागरिकांच्या व महावितरण कर्मचारी यांच्याही जीवाशीच खेळ होत आहे.या घाणीवर लवकरात लवकरच काहीतरी उपाययोजना करावी असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे एवढेच नाही तर जाफराबाद तालुक्यातील वरूड बु येथे एक ते दोन महिने नाल्यांची साफसफाई होत नाही त्यामुळे या नालीतील घाण पाणी रस्त्यावरुन वाहत आहे. त्यामुळे जागोजागी घाण पाण्याची डबके साचली आहेत. या घाण पाण्याची सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. तसेच गावात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग साचले आहे आहेत. घाण, दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या बाबीकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे साफ दुर्लक्ष होत असून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने गावातील नाल्यांची नियमित साफसफाई करून घाण पाण्याची विल्हेवाट लावण्यात यावी, अशी मागणी नागरिक करीत आहे.

### संतोष सपकाळ, लाईनमन वरूड बु

वरूड बू येथे बस स्टॉप जवळील विद्युत डीपी जवळ खूप दुर्गंधी झालेली आहे या ठिकाणी घाण होण्याचं मुख्य कारण म्हणज त्या ठिकाणी येणारे सांडपाणी आहे यावर ग्रामपंचायत प्रशासनाने काहीतरी उपाययोजना करावी.विद्युत कर्मचारी यांना विद्युत डीपी जवळ जीव धोक्यात घालून जावं लागत आहे. यामुळे विद्युत कर्मचारी यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे"

### अविनाश गाडेकर, ग्रामस्थ वरूड बु

"वरूड बू येथील काही गल्लीमध्ये अरुंद नाली असल्यामुळे थोडाही पाणी पडला तर त्या नाल्या लगेचच तुडुंब भरून वाहू लागतात,गावातील सरकारी जागेवरही कचरेची आणि दुर्गंधी चे साम्राज्य पसरलेले आहे यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका होण्याची शक्यता जास्त आहे यावर ग्रामपंचायत प्रशासनाने लवकरात लवकर काहीतरी उपाययोजना करावी"

## अतिवृष्टीग्रस्त पिक नुकसानीचा आढावा

## उपविभागीय अधिकारी शैलेश लोहोटी यांची जिंतूर तालुक्यात पाहणी




**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**

जिंतूर : तालुक्यात ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर महसुल विभागाची आढावा बैठक मंगळवारी (दि. २ सप्टेंबर) तहसिल कार्यालयात पार पडली. या बैठकीचे अध्यक्ष स्थान उपविभागीय अधिकारी (सेतु) शैलेश लोहोटी यांनी भूषविले बैठकीस तहसिलदार राजेश सरवदे, नायब तह सिलदार प्रशांत राखे, तालु क्यातील सर्व मंडळ अधिकारी, ग्राम महसुल अधिकारी तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. महसुल कामकाजाचा आढावा घेताना, अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यां कडून लोहोटी यांनी जाणून घेतली. यानंतर उप विभागीय अधिकारी लोहोटी, तहसिलदार सरवदे, नायब तहसिलदार राखे आदींनी मौजे वाधी धानोरा व मौजे चारठाण शेत शिवारात प्रत्यक्ष पाहणी केली. शेतात उभ्या असलेल्या सोयाबीन, उडीद व कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे या पाहणीत स्पष्ट झाले.या वेळी लोहोटी यांनी महसुल अधि काऱ्यांना शेतकऱ्यांच्या नुक सानीचे अचूक पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच शेतकऱ्यांना शासना कडून तातडीने मदत मिळावी यासाठी आवश्यक अहवाल वेळेत सादर करण्याचे निर्देशही दिले.

## निरंकारी मिशनचे 'वननेस वन' अभियान

## हिरवाई सोबत समर्पित सेवेची हळुवार अभिव्यक्ती

**सेवाशक्ती टाईम्स.**
**देवचंद्र समदूर.**



शेगाव : सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन आशी र्वादाने संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन मार्फत 'वननेस वन' परियोजनेचा पाचवा टप्पा रविवार, दि.17 ऑगस्ट रोजी देश भरातील 600 ठिकाणी मोठ्या श्रद्धेने व उत्साहाने संपन्न झाला. संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय श्री. जोगिन्दर सुखी जाजी यांनी याविषयी माहिती देताना सांगितले, की 'वननेस वन' हे अभियान केवळ हिरवाई किंवा वनराई पसरविण्याचा पुढाकार नसून प्रकृतीशी नाते, मानवी उत्तरदायित्व आणि सह-अस्तित्वाची भावना सदृढ करण्यासाठी समर्पित असा एक प्रयास आहे. बुलढाणा जिल्ह्या मध्ये वननेस वनचा दुसरा कार्यक्रम 17 ऑगस्ट रोजी सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र शेगांव येथे राबविण्यात आला ज्यामध्ये एकंदर 150 वृक्षांची लागवड करण्यात आली. शेगांव येथील दिवाणी व फौजदारी न्यायाल याच्या आवारात राबविण्यात आलेल्या या कार्य क्रमाचा शुभारंभ माननीय न्यायाधीश श्री. एन. डी. मेश्राम यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगी मिशनचे शेगांव येथील सेक्टर संयोजक श्री.संतोष शेगोकार यांच्यासह न्यायाल याचे रजिस्ट्रार श्री. ढबाले, श्री.आंबेकर, दैनिक देशोन्नतीचे वरिष्ठ पत्रकार श्री. अनिल उंबरकर आदि मान्यवर उपस्थित होते. सेक्टर संयोज कांच्या देखरेखी खाली मिशनचे स्थानिक सेवादल युनिट नं.1309 च्या अधिकारी व स्वयं सेवकांनी हा उपक्रम राबविण्या साठी महत्वपूर्ण योगदान दिले. मिशनतर्फे सन 2021 मध्ये देशभर सुरु करण्यात आलेल्या या अभियाना अंतर्गत अनेक ठिकाणी सुंदर वनराई उभी राहिली असून त्याने हरित लघुवनांचे स्वरुप धारण केले आहे. या लघुवनांमध्ये पहायला मिळत असलेले प्रवासी पक्षांचे स्थलांतर तसेच जैव विविधतेचे पुनरुत्थान हे प्रमाणित करते, की हे वृक्षारोपण केवळ पर्याव रणाचे रक्षणच करत नाही तर प्रकृतीच्या पुनरुज्जीवनाचे माध्यम बनत चालले आहे.

## उत्कृष्ट सूत्रसंचालना बद्दल प्रेमकिसन राठोड यांचा सत्कार

**सेवाशक्ती टाईम्स.**
**राजू राठोड.**




आर्णी : शीख समाजाचे नववे गुरु,हिंद की चादर श्री गुरु तेग बहादुर जी यांच्या ३५०व्या शहिदी कार्यक्रम सोहळ्याचा भव्य समारंभ पोहरादेवी धर्मपीठावर भाविकांच्या अलोट उप स्थितीत संपन्न झाला.या सोहळ्यात धर्म पीठाधीश्वर बाबु सिंगजी महाराज, अखिल भारतीय धर्म जागरणचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरदराव ढोले, धर्मगुरु महंत कबीर दासजी महाराज, धर्मगुरु जितेंद्रजी महाराज,आरोग्य दूत मा.रामेश्वरजी नाईक साहेब, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. विलास भाऊ राठोड, राष्ट्रीय महासचिव ॲड. पंडित भाऊ राठोड, प्रदेशाध्यक्ष मा. भिकनभाऊ जाधव, राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. पी.टी. चव्हाण, राष्ट्रीय प्रवक्ते मा. मधुकर राव जाठोत,युवा परिषदेचे प्रदेश अध्यक्ष मा.श्रीमंतराजे चव्हाण, प्रदेश सचिव उमेश राठोड, उपाध्यक्ष श्रावण पवार यांच्या सह विविध संत-महंत, धर्मगुरु व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आकर्षण म्हणजे राष्ट्रीय बंजारा परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष प्रेमकिसन राठोड यांनी केलेले प्रभावी सूत्र संचालन. त्यांच्या ओघवत्या वाणीने, शेरोशायरी व भक्तिमय शैलीत केलेल्या सूत्र संचालना मुळे संपूर्ण सभागृह मंत्रमु झाले. त्यांच्या उत्कृष्ट सूत्रसंचालना बद्दल धर्मपीठाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. आपल्या मार्ग दर्शनात बंजारा हृदय सम्राट, धर्मनेता, भगवंत सेवक मा. किसन भाऊ राठोड यांनी गुरु तेग बहादुर जींच्या शौर्यगाथेची आठवण करून दिली. मुघल सम्राट औरंगजेबाच्या अत्याचारांना न जुमानता गुरुजींनी धर्मरक्षणासाठी दिलेले बलिदान आणि बाबा लक्खी शाह बंजारा यांनी दाखविलेली अद्वितीय निष्ठा याचे भावपूर्ण स्मरण करण्यात आले. "गोर बंजारा आणि लभाणा समाज तसेच शीख बांधवांतील गुरु-बंधुत्व अधिक दृढ होणार आहे," असेही त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले. कार्य क्रमाचे मुख्य मार्गदर्शक मा.रामेश्वरजी नाईक यांनी आगामी काळात महाराष्ट्रभर अशाच प्रकारचे संत प्रवास, धर्मजागरण कार्यक्रम राबविण्याची माहिती दिली. व बंजारा समाजासाठी विविध योजना अंमलात आणण्याचे अभिवचन दिले. या द्विदिवसीय कार्यक्रमात समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. अनेक भाविकांनी स्वयं प्रेरणेने राष्ट्रीय बंजारा परिषदेत प्रवेश केला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष श्याम भाऊ राठोड, नारायण भाऊ चव्हाण, नामदेव आडे व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन प्रदेशाध्यक्ष मा. भिकनभाऊ जाधव यांनी केले.व उत्कृष्ट सुत्रसंचलन प्रेमकिसन राठोड यांनी केले.

## निराधार विधवेस शेळी-करडू, किराणा साहित्य भेट

## एचएआरसी संस्थेचा गौरी-गणपती निमित्त सामाजिक उपक्रम

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**



जिंतूर : होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेतर्फे गौरी-गणपती सणाच्या निमित्ताने निवळी खुर्द (ता. जिंतूर) येथील निराधार विधवा सिंधुताई कांदे यांना उदरनिर्वाहासाठी शेळी व करडू तसेच जीवनावश्यक किराणा साहित्य देऊन सामाजिक बांधिलकी जपली. सिंधुताई कांदे यांच्या पतीचे काही वर्षांपूर्वी किडनीच्या आजाराने निधन झाले. वयाच्या केवळ २६व्या वर्षी वैधव्याचे दुःख सहन करावे लागले. सासर-माहेरचा आधार नसल्याने त्या शेतमजुरीवर उदर निर्वाह करतात. त्यांना नऊ वर्षांची मुलगी असून, कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळालेला नाही. या कठीण परिस्थितीची दखल शिक्षक प्रकाश डुबे यांनी घेतली व एचएआरसी संस्थेकडे मदतीची विनंती केली. या उपक्रमासाठी साईबाबा इंडस्ट्रीजचे जिल्हा उद्योजक पुरस्कारप्राप्त संतोष वट्टमवार यांनी १५ हजार रुपयांची मदत करून शेळी-करडू दिले. तसेच आलोक जोशी, संतोष बारबिंदे, दिनकर चौधरी यांच्या सहकार्याने एका महिन्याचा किराणा साहित्य पुरवठा करण्यात आला. या वेळी डॉ. पवन चांडक, ॲड. चंद्रकांत राजुरे, डॉ. दिनेश भुतडा, प्रा. कैलास मुटकुळे, अँड. मनोज सारडा, तुकाराम गीते, सरपंच रामप्रसाद कांदे यांच्यासह गावातील मान्यवर उपस्थित होते.

## मंठा येथे राजस्थानी गणेश मंडळाच्या वतीने जम्मा जागरण कार्यक्रमाचे आयोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शुद्धोधन खंदारे.**



मंठा : राजस्थानी गणेश मंडळाच्या वतीने जय महेश संचलित बाबा रामदेवजी जम्मा जागरण कार्य क्रमाचे आयोजन गुरुवार ता.4 रोजी करण्यात आले आहे. प्रस्तुत कर्ता डॉ. अमर लड्डा (परभणी) यांच्या सुमधूर वाणीतून मंठा येथील गजानन मंगल कार्यालय जालनारोड येथे सायं काळी 7 ते 9 यावेळेत होणाऱ्या जम्मा जागरण कार्यक्रमाला शहरवासीयांनी आपल्या कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राज स्थानी गणेश मंडळाच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष तेजस कासट, उपाध्यक्ष रमण दायमा, सचिव सोमेश चोकडा, सहसचिव कृष्णा मणियार, कोषाध्यक्ष राजेश मणियार, सहकोषाध्यक्ष सुरेश भुतडा, सल्लागार शरद मुरख्या, आशिष भांगडिया, सचिन साबू, यश तिवारी, सदस्य अनुराग कासट, जगदीश साबू, सुदर्शन भुतडा, मधुर मणियार, गणेश भुतडा, सौरभ दायमा, शुभम दायमा, कपिल तिवारी, गणेश बियाणी यांनी केले आहे. राजस्थानी गणेश मंडळाने आकर्षक अशा गणेश मूर्तीची स्थापना केली असून दररोज सकाळ संध्याकाळ भाविक भक्तांच्यावतीने आरती करण्यात येऊन प्रसादाचे वाटप केले जाते.

## MIDC व्यापारी सुफीयान हत्या प्रकरण

## १२ तासात स्थानिक गुन्हे शाखा अकोला कडुन सर्व आरोपी वाहणासह ताब्यात

**सेवाशक्ती टाईम्स.**
**जुनेद अली.**

अकोला : पो. स्टे खदान येथे दि. ०१ / ०९ / २०२५ रोजी फिर्यादी नामे शेहरे आलम समीरउल्ला खॉ वय २६ वर्ष राशिवणी, अकोला याने रिपोर्ट दिला की, दि.३१/०८/२५ रोजी सायंकाळी ०७/३० वाजता चे सुमारास त्याचा मालक सुफीयान खान सोबत साजीद खान, मोहम्मद कैफ बक्शउल्ला खान असे रल्वे लाईन बोगदा मलकापुर जवळ होन्डाई कारने गेले होते तेथे सिगारेट पित असतांना मोटार सायकल वर ०४ अनोळखी इसम आमचे जवळ येवून अंगावर आले व म्हणाले की, इकडे मुलगी वगैरे घेवुन आले आहे का? असे म्हणुन चारही इसमांनी लायबुक्यांनी तसेच त्यांचे जवळील चाकु काढुन सुफीयान खान याचे अंगावर गेले त्यावेळी सुफीयान याने कैफ व मला जावुन कार खान्यातुन लोकांना बोलावुन आणा असे म्हटले त्यामुळे आम्ही दोघे कारखान्या कडे धावत गेलो त्यावेळी सुफीयान खान व साजीद खान हे दोघे तेथेच होते त्यांना ते इसम मारहाण करीता होते मी कार खान्यातुन लोकांना बोलावुन त्या ठिकाणी आलो असता साजीद ने सांगीतले की, एक अनोळखी आर्मी रंगाची टिशर्ट घातलेल्या ज्याचे उजव्या कानामध्ये रिग घातलेली होती या इसमाने त्याचे सोबत असलेल्या दुस-या काळया रंगाचे फुल टिशर्ट घातलेल्या इसमास चाकुने मार असे म्हटले होते. त्यावरुन त्याने सुफीयान खान याला चाकुने जिवानीशी ठार मारण्याचे उद्देशाने पोटावर पाठीवर सपासप वार केले त्यामुळे सुफीयान खान गंभीर जखमी होवुन त्याचा रक्त स्त्राव झाला होता. त्यातील काही इसमांनी पकडुन पकडुन माझे नाकावर तोंडावर बुक्यांनी क्यांनी व फायटर नी मारहाण केली त्या मुळे नाकातुन रक्त निघाले. अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन खदान अकोला येथे अप क ७०२/२५ कलम १०९,११८ (१), ११५(२), ३ (५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपासावर आहे. सदर गुन्हयात जखमी असलेला सुफीयान खान शमशोद्दीन खान हा उपचारा दरम्यान मरण पावला असुन त्याचे सोबत चे साथीदार साजीद खान हा गंभीर जखमी आहे. सदर गुन्हयातील आरोपी चा शोध घेणे बाबत मा. पोलीस अधिक्षक सा यांनी पोलीस निरीक्षक स्थानिकगुन्हे शाखा अकोला व त्यांचे पथक



यास आरोपीचा तात्काळ शोध घेण्या बाबत आदेशीत केले. मध्य रात्रीचे वेळी घटनेची माहीती मिळताच पोलीस अधिक्षक यांना माहीती देवुन त्याचे आदेशाने रात्रीच स्थानिक गुन्हे शाखा पथक घटनास्थळी भेट देवुन तपास सुरु केला होता. सर्व आरोपी अज्ञात होते घटनास्थळ जंगल भागात रेल्वे लाईन ला लागुन असलेल्या निर्जन स्थळी होतो. घटना स्थळावर कोणतेही सिसिटीव्ही कॅमेरे नव्हते अथवा आरोपीचे वर्णन किंवा त्यांच्या मोबाईल बाबत माहीती नसतांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके ०३ अधिकारी २० अमंलदार यांनी घटनास्थळी भेट देवुन सर्व बाजुनी तपास करुन गोपनीय बातमीदार व तांत्रीक विश्लेषना वरुन आरोपी १) फैजान खान मुर्शरफ खान रा. हाजी नगर शिवणी अकोला २) अब्दुल अरबाज अब्दुल इस्माईल रा. ताज चौक, इंदीरा नगर अकोट फाईल, अकोला ह.मु. गंगा नगर ऐअल्ला रसुल मस्जीद जवळ, अकोल., ३) शोएब अली उर्फ राजा तैयब अली रा सैयद पुरा शिवणी, अकोला., वाशीम बायपास येथुन दुपार नंतर ताब्यात घेतले त्यांचे पुढील माहीती वरुन एक पथक बुलढाणा जिल्हयात रवाना होवुन शेगाव येथुन फरार होण्याचे तयारीत असलेले ०३ आरोपी नामे १) शेख अस्लम शेख अकबर रा. सोळशे प्लॉट, अकोट फाईल, अकोला ह.मु. सैयद पुरा शिवणी अकोला., २) सैय्यद शहबाज उर्फ सोनु सैय्यद मुजीब, रा. रामदास मठ ताज चौक, चक्की जवळ, अकोट फाईल, अकोला ३) विधी संगर्षगस्त बालक यांना मोटार सायकल सह ताब्यात घेतले. नमुद आरोपीतांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचीकबुली दिल्याने त्यांना पुढील तपास कामी पो. स्टे खदान यांचे ताब्यात देण्यात आले. फिर्याद मध्ये नमुद प्रमाणे फिर्यादी व त्याचे साथीदार हे निर्जनस्थळी संध्याकाळचे वेळी सिगारेट वगैरे वे सेवन करीत होते परंतु आरोपीतांना असे वाटले की, त्यांच्या सोबत मुलगी असावी या कारणाने त्यांच्यात वाद होवुन मारामारी झाली आहे.सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित वांडक सा, मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. बी. चंद्रकांत रेड्डी सा. यांचे मार्गदर्शना खाली पो. नि. शंकर शेळके, स्थानिक गुन्हे शाखा, अकोला. सहा. पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, स.पो.नि गोपाल ढोले, पोउपनि. विष्णु बोडखे, पोउपनि. माजीद पठान खान, श्रेणी पोउपनि दशरथ बोरकर, पो. हवा. शेख हसन, फिरोज खान, अब्दुल माजीद, वसीमोद्दीन, सुलतान पठाण, किशोर सोनाने, रविद्र खंडारे, खुशाल नेमाडे, उमेश पराये, एजाज अहमद, भास्कर धोत्रे पो. कॉ अभिषेक पाठक, आकाश मानकर, राज चंदेल, मो. आमीरसतीष पवार, श्रींकात पातोंड, अशोक सोनवणे, स्वप्नील खेडकर, अन्सार अहमद, स्वप्निल चौधरी, राहुल गायकवाड, चालक पो. हवा. प्रशांत कमलाकर, देवानंद खरात, प्रविण कश्यप यांनी केली.




जेष्ठ गौरी पूजन करतांना अंजनी बु चे माजी सरपंच श्री गजानन टोणपे सह परिवार अंजनी बु ता मेहकर जिल्हा बुलढाणा




विजय वायाळ खंडाळा देवी यांच्या घरच्या गौराई, महालक्ष्मी




पोलीस ठाणे जाफराबाद तर्फे माहोरा येथे गणपती महोत्सव निमित्ताने रुठ मार्शल काढण्यात आला
(छायाचित्र दिपक जैस्वाल)





महालक्ष्मी अर्बन परिवार जानेफळ यांच्या कडुन देऊळगाव साखरशा येथील दैनिक सेवाशक्ती टाईम्स चे पत्रकार श्री नवल भाऊ राठोड यांचा सत्कार करण्यात आला










दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# समता आणि महापुरुषांचे विचार अंगीकारल्यासच खरी प्रगती – आमदार सिद्धार्थ खरात

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

मेहकर : दि २"समाजात स्त्री-पुरुषांची, श्रीमंत-गरीबांची खरी समता प्रस्थापित झाली तरच राष्ट्राची खरी प्रगती शक्य आहे. मागे राहिलेल्यांना पुढे नेणे हीच खरी समाज कारणाची दिशा आहे. त्याच बरोबर समाज प्रबोधनासाठी महापुरुषांचे विचार वारंवार स्मरणात ठेवून आचरणात आणणे अत्यावश्यक आहे," असे प्रतिपादन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांनी विठ्ठलवाडी येथील कार्य क्रमात बोलताना केले.ते पुढे म्हणाले, "ज्यांना जीवनात मागे पडावे लागले आहे, बेरोजगारी मुळे किंवा संधीअभावी ज्यांचा व्यवसाय थांबला आहे, त्यांना हात देऊन उभे करणे हे आपले कर्तव्य आहे. समाजातील प्रत्ये काला समान संधी मिळाली पाहिजे. राजकारण केवळ सत्तेसाठी नसून मानवतेसाठी असले पाहिजे. आपण जर एकमेकांना साथ दिली तरच खरी लोकशाही बळकट होईल." यावेळी त्यांनी आदिवासी समाज, बंजारा वस्ती आणि वलचीन समाजा



च्या प्रश्नांवर विशेष लक्ष केंद्रित करत, "या समाजाला दीर्घ काळ अन्याय व वंचना सहन करावी लागली. आता त्यांना पुढे आणण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे," असे स्पष्ट केले.तसेच महापुरुषांचे विचार सतत अंगीकारल्या शिवाय प्रगती शक्य नसल्याचे सांगताना आमदार खरात म्हणाले, "जशी चूल पेटवण्या साठी वारंवार लाकूड टाकावे लागते, त्याचप्रमाणे आपल्या मनात महापुरुषांचे विचार वारंवार जागवले पाहिजेत. बाबा साहेब आंबेडकर, वसंतराव नाईक, तसेच संत परंपरेतील सेवा लाल महाराज यांचे कार्य लोक शाही व सामाजिक ऐक्याला बळकटी देते. संतांच्या शिकवणी तून आप ल्याला योग्य आचार-विचाराचा मार्ग आणि प्रेरणा मिळते." यावेळी सरपंच धनराज राठोड, रयत क्रांतीचे प्रदेश उपाध्यक्ष जितूवा डीकर शिवसेना तालुका प्रमुख निंबाजी पांडव शाखाप्रमुख राहुल चव्हाण युवा सेनेचे ज्ञानेश्वर राठोड जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष भास्कर ठाकरे जगराम राठोड रमेश राठोड श्रीराम चव्हाण शेषराव राठोड संतोष चव्हाण बाबू सिंग राठोड मखराम राठोड जयसिंग आडे बंडू साबळे बद्रीनाथ चव्हाण बळीराम पवार गणेश राठोड कैलास पवार कैलास चव्हाण दिलीप पवार रामेश्वर राठोड मनोज जाधव विजय आडे राऊत सर भागवत बोरकर दीपक गायकवाड पवन टाले सह गावकरी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## राष्ट्रीय महामार्गावर खड्डे बुजवताना सामाजिक कार्यकर्ते

**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्रीकृष्ण पंधे.**

बिबी : राष्ट्रीय महामार्गावर मुंबई - नागपूर वरील बिबी परिसराच्या हद्दीमध्ये मोठे खड्डे पडले असल्याने याठिकाणाहून वाहन चालविण्याची मोठी कसरत होत आहे. पावसाळा सुरु असल्याने खड्ड्यात पाणी साचले असून चिखल देखील झाल्याने दुचाकी चालकांना मोठा त्रास" सहन करावा लागतो त्याकडे संबंधित विभागाने दुर्लक्ष केलेली असून या ठिकाणी



कुठलेही दुर्घटना घडू नये म्हणून बिबी येथील सामाजिक कार्य कर्ते कार्तिक धाईत, गजानन पंधे, दीपक लोहारे, राजू खर्डे राजू चव्हाण चेतन ढाकणे सिद्धेश्वर धाईत पवन धाईत बाळू काकडे यांनी भर पावसात मुरुम टाकून गड्डे बुजवली

# भोकरदन येथे राष्ट्रीय व राज्य स्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न

# युवा.प्रबोधनकार गायक देवानंद वानखेडे राज्यस्तरीय कला रत्न पुरस्काराने सन्मानीत

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

भोकरदन : शोतोकाॅन कराटे व क्रीड़ा मंडळ जिल्हा जालना भोकरदन महाराष्ट्र तथा भाऊ फाऊंडेशन पँथर्स महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्य माने समाजिक कार्यकर्ता तथा राष्ट्रीय क्रीड़ा मार्गदर्शक खेळाडु कलावंत यांना राष्ट्रीय व राज्य स्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवर





यांच्या हस्ते करण्यात आले या वेळी महेंद्र साबळे गट विकास अधिकारी पंचायत समिति भोकरदन, संस्थापक दिपक भाऊ हिवाळे राष्ट्रीय अध्यक्ष समाज भुषण पँथर अनिलभाऊ पगारे, जि. प. प्रशाला शाळेचे मुख्या ध्यापक जंजाळ सर, नगर सेवक श्रावण अक्से, अँड. डि. एस. जाधव अँड.के एस बनकर ,पि. एस. आय. पवन राजपूत,डि. के. सर, माजी नगर सेवक चंद्रकांत पगारे, माजी पोलीस अधिकारी गोकुल सिंह बुदिले रोहण भाई डोळसे, संजय भाई डोळसे, विकास भाई डोळसे, राहुल नवगिरे, गुड्डू भाई कादरी, यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. व मान्यवर यांच्या हस्ते कवी. गायक एस. के. जाधव सर, राज्य स्तरीय समाज भूषन, तसेच युवा प्रबोधनकार गायक देवानंद वानखेडे राज्यस्तरीय कला रत्न या पुरस्काराने सन्मानीत करन्यात आले व तसेच राज्या तिल व देशातिल राष्ट्रीय क्रीड़ा पुरस्कार, राष्ट्रीय जिवन गौरव पुरस्कार, कला रत्न पुरस्कार, समाज भूषण, पुरस्कार देऊण दब्बल १००पुरस्कार प्रधान करण्यात आले .

## येलदरी धरणातून विसर्ग वाढला; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**

जिंतूर : येलदरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण घटले असले, तरी खडक पूर्णा धरणातून वाढलेल्या विसर्गामुळे येलदरी धरणाचे गेट्स मंगळ वारी (दि. २) दुपारी उघडण्यात आले.दुपारी १२ वाजता धरणाचे गेट क्रमांक १, ३, ५, ६, ८ व १० हे प्रत्येकी ०.५ मीटरने उघडून १२ हजार ६५९ क्युसेक पाणी पूर्णा नदीपात्रात सोडण्यात आले. तसेच स्पिलवेल गेटमधून २ हजार ७०० क्युसेक पाणी सोडण्यात आल्याने एकूण १५ हजार ३६० क्युसेक विसर्ग करण्यात आला आहे.धरणात पाण्याची होणारी आवक लक्षात घेऊन विसर्गात वेळो वेळी वाढ अथवा कपात केली जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. दरम्यान, नदी काठच्या गावांनी सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भव्य भजन संध्या व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून मा.श्री.सावताजी काळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कुलदीप बिनगे.**

परतूर : भाजपा तालुका संघटन सरचिटणीस मा.श्री. सावताजी काळे यांच्या वाढदिवसानिमित्त १ सप्टेंबर रोजी दिवसभर विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना गावकऱ्यांसह विविध संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या विशेष प्रसंगी माजी मंत्री मा.श्री.आमदार बबनरावजी लोणीकर साहेब व महाराष्ट्राचे युवाहृदय सम्राट मा.श्री.राहुल भैया लोणीकर यांनी त्यांना फोनद्वारे शुभेच्छा देत सावता काळे मित्र परिवाराच्या वतीने राबविलेल्या सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे कौतुक केले. त्यांनी परतूर तालुक्यात भाजपाचे कार्य उत्कृष्ट पद्धतीने सुरू असल्याचे गौरवपूर्वक नमूद केले आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.वाढदिवसाच्या दिवशी कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ०९.०० वाजता लक्ष्मी गंगा गौशाळा येथे झाली. त्यामध्ये झंवर काका तसेच गोशाळेचे सर्व स्नेही यांनी सेवेची संधी दिली येथे जनावरांसाठी चारा वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे शेतकरी बांधव आणि गौप्रेमी यांच्यात समाधान आणि आनंदाचे वातावरण पसरले.यानंतर ०९.३० वाजता स्नेहांकुर अनाथ आश्रम येथे लहान मुलांना शालेय साहित्य आणि पौष्टिक नाष्टा वाटप करण्यात आले. मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद हा



या उपक्रमाचा सर्वात मोठा पुरस्कार ठरला.पुढे सकाळी १०.०० वाजता दृष्टी लॉयन्स संस्थेत फळ वाटपाचा कार्यक्रम पार पडला. येथील कार्यकर्त्यांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले.दुपारी १२.०० ते ०३.०० वाजेपर्यंत तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत भव्य आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. शेकडो नागरिकांनी या शिबि राचा लाभ घेतला. रक्तदाब, मधुमेह, नेत्र तपासणी, सामान्य आरोग्य तपासणी आणि वैद्यकीय सल्ला मोफत उपल करून देण्यात आला. नागरिकांनी हा उपक्रम कायम ठेवण्याची मागणीही व्यक्त केली यामध्ये डॉ.आनंद तनपुरे,डॉ.मंत्री, डॉ ढेरे सर,डॉ. आंबेकर साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले संध्या काळी ०८.०० वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, प्रल्हाद पूर येथे हिंदू संस्कृतीनुसार सत्संग आणि भव्य भजन संध्या आयोजित करण्यात आले. अमोलजी अग्रवाल,मुंदडा काका, रोशनजी बगडिया यांनी मराठी हिंदी भक्तिमय भजन गायले भाजपाची जबाबदारी सांभाळत असतानाही धार्मिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे मा. सावताजी काळे यांनी या परंपरेला अनुसरून हा कार्यक्रम आयोजित केला. प्रसिद्ध कीर्तन कार आणि भजन मंडळांनी सादर केलेल्या अभंग, गवळणी आणि भक्तिगीतांनी संपूर्ण परिसर भक्ति रसात न्हाऊन निघाला. भक्तांनी टाळ-चिपळ्यांच्या गजरात हरिना माचा गजर करत वातावरण भारावून टाकले. कार्य क्रमाच्या शेवटी मा.श्री. साव ताजी काळे यांनी सर्व मान्यवर, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. "सामाजिक कार्य, धार्मिक सेवा आणि सांस्कृतिक परंपरा या तिन्ही गोष्टी माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. पुढेही याच मार्गावर कार्य करत राहीन," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहरातील व तालुक्यातील भाजप परिवाराने विशेष प्रयत्न केले तसेच शहरातील व तालुक्यातील सावता काळे यांचा मोठा समर्थक वर्ग असल्याने त्यांनी मोठ्या प्रमाणात शुभेच्छा दिल्या.

## आझाद नगर येथे गणपती बाप्पा महाप्रसादाचा लाभ व दर्शन घेण्यात आले

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अनिल जाधव.**



ठाणे : श्री दत्ता जाधव अध्यक्ष श्री अर्जुन राठोड श्री नामदेव राठोड श्री दिलीप जाधव श्री सुभाष राठोड श्री नारायण भाऊ आडे सामाजिक कार्यकर्ता व नायक कारभारी तसेच मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते तसेच गणपती बाप्पाचे दर्शन व महाप्रसाद घेण्यात आले व गणेश मंडळाचे आभार व्यक्त केले अशी माहिती श्री नारायण भाऊ एच आडे यांच्या माहितीस्त्रावरून असे कळते हे विशेष.

## आझाद नगर येथे गणपती बाप्पा महाप्रसादाचा लाभ व दर्शन घेण्यात आले

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**



साखरखेर्डा : येथून जवळच असलेल्या सावंगीमाळी येथील धरण क्रमांक १ व धरण क्रमांक २ चे काम हे सन १९९० ला पुर्ण झाले आहे .तेव्हा पासून आजतागायत ३५ वर्षा पर्यंत दोन्ही धरणाच्या भिंती ची सुरक्षा तसेच धरणक्षेत्राची देखभाल या संबंधित विभागाने कोणती ही पाहणी केली नाही .तसेच धरण संरक्षण भिंत आणि त्याची दखल ही घेतली नाही.सदर धरणाच्या सुरक्षा संबंधी ३५ वर्षा पासून धरणाच्या भिंतीवर मोठ्या प्रमाणात अनेक प्रकारचे झाडे झुडपे घनदाट प्रमाणात दाटीवाटीने उंच वाढलेले आहेत.उदा काटेरी बाभळी व बोरी तसेच पळस व इतर झाडे खुप वाढली आहेत. सदर झाडाचे खोड व मुळे हे मोठे झाले असल्याने त्या झाडाचे मुळे भिंतीत खोलवर घट्ट रुजली आहेत. त्यामुळे धरणाची भिंत दिसत नसून धरणास जंगल सदृष्य सारखे भिंतीला स्वरुप प्राप्त झाले आहे.त्यामुळे चिंतेची बाब लक्षात घेता भिंतीवरील झाडे झुडपे तोडून ती काढून भिंत स्वच्छ करणे अत्यंत गरजेचे आहे. जर ही झाडे काढले नाही तर झाडाचे मुळे धरणाच्या भिंतीत खोलवर आणखी प्रमाणात दिवसेंदिवस रुजत जातील व झाडांच्या मुळातून धरणाच्या भिंतीतून पाणी हळू, हळू पाझरत आणि झिरपत राहणार यामुळे हळूहळू, मुळातुन वाहणाऱ्या ,पाण्याचा प्रवाह हा वाढत जाईल . त्या मुळे धरण फुटून जमिनी खरडू जातील तसेच दोन्ही धरणाच्या मुख्य प्रवाहात असलेले सावंगीमाळी हे गाव व त्या शेजारीच असलेले सावंगीवीर हे गाव वाहून जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो व जीवीत हानी ही होऊ शकते .त्यामुळे धरण सुरक्षीत राहावे यासाठी लवकरात लवकर प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करुन धरण संरक्षण भिंतीवरील झाडे फुडपे वेळीच काढून टाकवी अशी मागणी अॅड.आर एन वानखेडे, सरपंच व सावंगी माळी येथील सर्व शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# फुबगाव जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळात पाण्याची बॉटल वाटप शाळा व्यवस्थापन समितीतर्फे विद्यार्थ्यांचे कौतुक

**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्याम राठोड.**

दारव्हा : दारव्हा तालुक्यातील फुबगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांच्या कौतुक राशीतून विद्यार्थ्यांना चांगल्या क्वालिटीचे पाणी बॉटल चे वाटप जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध कलात्मक व बोधपर सहशालेय उपक्रम राबविले जातात गत प्रजासत्ताक दिनी शाळेने चमकते तारे 2025 हा कलाविष्कार उपक्रम सादर केला होता त्यामध्ये प्रेक्षकांनी चिमुकल्या विद्यार्थ्यांना कौतुक राशी दिली त्यातूनच यंदाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून कौतिक राशीतून बॉटल वितरित केल्या फुबगावच्या शाळा व्यवस्थापन समिती पालक वर्ग ग्रामस्थ व शिक्षक वृंदाकडून कलाविष्कार कार्यक्रमात विद्यार्थ्यांना १५ हजाराची कौतुक राशी मिळाली होती. त्यामध्ये शिक्षकांनी व शाळा व्यवस्थापन समितीने अधिक पैशाची भर घालून स्वतंत्र दिनाचे औचित्य



साधून स्वातंत्र्यदिनी विद्यार्थ्यांना मदत व्हावी यासाठी शाळा व्यवस्थापन समितीने अनोखा उपक्रम राबविला १५० विद्यार्थ्यांना बॉटल चे वितरित केले,मागील वर्षी सुद्धा शाळा व्यवस्थापन समितीच्या पुढाकाराने असाच एक उपक्रम राबविला होता त्यामध्ये १५० विद्यार्थ्यांना स्कूलबॅग चे वाटप करण्यात आले होते. या अभिनव उपक्रमाची सांगता करण्यात आली यावेळी उपस्थित शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा दारव्हा तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष अतुल राऊत शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष नंदा राठोड सदस्य रामकृष्ण घोंगे गुणवंत कचरे मोरेश्वर भीमटे अवधूत चव्हाण भारती सहारे अनुराधा सोयाम प्रीती चव्हाण ग्रामपंचायत सदस्य मोहन देशमुख मुख्याध्यापक गजानन बुरखंडे, शिक्षक भगवंत गुजर अशोक देशपांडे नितीन साखरकर नंदकिशोर चौधरी प्रतिक्षा लोहकरे मंदा लोहकरे सुशिला चव्हाण उमेश राठोड पप्पू काळे लखन देशमुख निलेश उघडे सचिन जयस्वाल महेंद्र रामटेके ऋषिकेश देशमुख गजानन भागवत शाम दहिफळकर मंगेश जाधव गणपत आडोळे रितेश ठाकरे विशाल देशमुख गुलशन नंदागवळी विलास कोयरे पवन कोल्हे रवि उघडे निलेश मेश्राम अंकुश देशमुख किरण भिमटे युवराज ठाकरे राज राऊत मयुर चव्हाणअक्षय निकोडे उपस्थित होते

# समाजसेवक सुमित रामकिसन खंडारे यांना भोकरदन या ठिकाणी राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

बुलढाणा(मेहकर) : भोकरदन येथे सप्टेंबर २०२५ रोजी शोतोकान कराटे व क्रीडा मंडळ जिल्हा जालना तथा भाऊ फाऊंडेशन पँथर्स महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्ता तथा राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक खेळाडू कलावंत यांना राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, यावेळी कार्य क्रमाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष महेंद्र साबळे(गटविकास अधिकारी भोकरदन)प्रमुख पाहुणे पवन राजपूत साहेब (PSI),जि. प. प्रशाला शाळेचे मुख्याध्यापक जंजाळ सर, नगरसेवक श्रावण अक्से, अ‍ॅड. डि. एस. जाधव, अ‍ॅड. के. एस. बनकर, कराटे चॅम्पियन डि. के. सर, मा. नगरसेवक पगारे मा.पोलिस अधिकारी गोकुल सिंह बुंदले, रोहन डोळस भाई कादीर राहूल नवगिरे उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले, महाराष्ट्र राज्यस्तरावर विविध क्षेत्रांतून पुरस्कारा साठी निवडले ल्या 100 मानकऱ्यांना या सोहळ्यात मानाचा फेटा, महावस्त्र, गौरव पदक, सन्मानचिन्ह आणि मानपत्र या स्वरूपात राज्यस्तरीय पुरस्कार थाटात प्रदान करण्यात आले. यावेळी प्रत्येक पुरस्कार कर्त्यांनी आपापल्या कार्याचा आढावा सर्वांसमोर मांडला. या भव्य दिव्य पुरस्कार सोहळा वितरणा मध्ये यावेळी, समाज सेवक, कामगार नेते सुमित राम किसन खंडारे जनप्रहार कामगार संघटनेचे मा.जिल्हाध्यक्ष, S9TV जिल्हा प्रतिनिधी, दैनिक सेवाशक्ति टाईम्स, तालुका प्रतिनिधी,




महाराष्ट्र न्यूज, पत्रकार तथा संचालक इन्स्पायर कोचिंग क्लासेस मेहकर यांना महाराष्ट्र राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले ,या कार्यक्रमाचे आयोजक पँथर चे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल भाऊ पगारे, यांनी सुमित रामकिसन खंडारे यांनी आज पर्यंत सामाजिक व पत्र कारिता मध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत सामाजिक कार्याची व पत्रकारी करिता यासाठी केलेले कार्य, संघटित व असंघटित काम गारांना न्यायव हक्क मिळवून देण्यासाठी जनप्रहार कामगार संघटनेच्या माध्यमातून नोंदणी करण्यासाठी प्रयत्न करीत राहिले, मेहकर मध्ये नोंदणीकृत काम गारांना दोन वेळेचे भोजन सुरू करण्याचे कार्य यांनी केले. विविध प्रकारच्या काम गारांच्या योजनां साठी कार्य केले. तसेच इन्स्पायर कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना अल्प दरात शिक वण्याचे कार्य केले, तसेच पत्रका रितेच्या माध्यमातून कोण त्याही प्रकारचा पक्षपात न करता, प्रत्येक बातमीची दखल घेत असतात, हे सर्व कार्य करत असताना आपल्या मुलीचा स्वरा सुमित खंडारे हिचा पहिला वाढदिवस पालावरील मुलांना फराळाचे वाटप करून साजरा केला ,दुसरा वाढदिवस अपंग मुकबधिर शाळेमध्ये जेवण देऊन साजरा केला,आणि तिसरा वाढदिवस अंध मुलांच्या शाळेत फराळाचे वाटप करून साजरा केला, या सर्व कार्याची दखल घेत, सुमित रामकिसन खंडारे यांना उपस्थित राहुन राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, यावेळी कार्य क्रमाचे सूत्रसंचालन राजेश भिंगारे, आभार प्रदर्शन समाज भूषण पॅंथर अनिल भाऊ गोरे यांनी केले.

# रमाई विचार मंचच्या अध्यक्षा आशाताई खिल्लारे यांना 'धम्मरत्न' पुरस्कार जाहीर

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**

जिंतूर : धम्ममैत्री संवाद अभियानाचा २०२५ या वर्षाचा धम्मरत्न पुरस्कार रमाई विचार मंचच्या अध्यक्षा आशाताई संभाजी खिल्लारे यांना जाहीर झाला आहे. ही माहिती अभियानाचे निमंत्रक संजय बगाटे यांनी सोमवारी (दि. २ सप्टेंबर) पत्रकारांना दिली.बुद्ध, धम्म व संघ या त्रिरत्नांप्रती निष्ठा, तसेच पंचवीस वर्षांपासून समाजात प्रबोधनपर व कृति प्रवण कार्य करत असलेल्या आशाताई खिल्लारे यांच्या योगदानाची दखल घेत या वर्षी त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. आशाताई गेल्या अनेक वर्षांपासून महिलांच्या सबली करणासाठी, समाजातील वंचित घटकांच्या



हक्कां साठी आणि बौद्ध समाजातील संघटनात्मक बांधणी साठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यात सामाजिक ऐक्य, शैक्षणिक जाणीवा, स्त्री-पुरुष समता आणि बौद्ध धम्माच्या तत्त्वांचा प्रसार हे केंद्रबिंदू राहिले आहेत.यापूर्वी धम्ममैत्री संवाद अभियानाच्या वतीने नामांकित सर्जन डॉ. परमेश्वर साळवे, जेष्ठ बौद्धाचार्य भानुदास साबळे व समाज प्रबोधन कार्यकर्त्या सुनंदा ताई हातागळे यांना 'धम्मरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यामुळे यावर्षीचा पुरस्कारही विशेष मानला जात आहे. धम्ममैत्री संवाद अभियान तर्फे दरवर्षी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त बोधिपथ धम्मक्रांती महोत्सवाचे आयोजन परभणी येथे केले जाते. याच महोत्सवात येत्या ५ ऑक्टोबर रोजी मान्य वरांच्या उपस्थितीत आशाताई खिल्लारे यांना 'धम्मरत्न' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

# आरक्षणावर तोडगा जातनिहाय जनगणनेतच ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाची मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

बुलडाणा : महाराष्ट्रात सध्या मराठा आणि ओबीसी आरक्ष णाचा प्रश्न गंभीर टप्प्यावर पोहोचला असून समाजामध्ये असंतोष निर्माण होऊ लागला आहे. सामाजिक सलोखा धोक्यात येऊ नये यासाठी जात निहाय जनगणनेची तातडीने अंमलब जावणी करावी, अशी मागणी ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.या संदर्भात दिलेल्या निवेद नात संघाने म्हटले आहे की, आरक्षण हा केवळ भावनांचा विषय नसून तो घटनात्मक हक्क आहे. कोणत्या समाजाला किती प्रमा णात आरक्षण द्यावे, हे ठरवण्या साठी वस्तुनिष्ठ आकडे वारी आवश्यक आहे. जातनिहाय जन गणना केल्यास प्रत्येक समाजाची खरी लोकसंख्या तसेच त्यांची शैक्षणिक, सामाजिक आणि



आर्थिक स्थिती स्पष्ट होईल. त्यानंतर आरक्षणाचे वितरण न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने करता येईल.संघाने स्पष्ट केले आहे की, वस्तुनिष्ठ आकडेवारी अभावी समाजात गैरसमज, मत्सर आणि संघर्ष वाढत आहेत. त्यामुळे जात निहाय जनगणना हाच या समस्येवरचा प्रभावी तोडगा ठरू शकतो. शासनाने तातडीने या मागणीची दखल घेऊन आव श्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा संघाने निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे. यावेळी संघाचे राज्य सल्लागार डॉ.शिवशंकर गोरे, जिल्हा ध्यक्ष किशोर पवार, बुलडाणा तालुकाध्यक्ष गजानन पडोळ, गजानन हुडेकर, गजानन शेलेकर, निलेश डुकरे, जनार्धन तेजनकर इ.उपस्थित होते.

# आडगाव राजा येथे जीवघेणे खड्डे बुजविण्यासाठी रामदास कहाळे यांचे आमरण उपोषण सुरू

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**




सिंदखेड राजा : जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या निष्क्रियते मुळे ऐतिहासिक आडगाव राजा ते सावखेड तेजन या महत्त्वाच्या रस्त्यावर "अपघातांचा सापळा" बनला असून यामुळे शाळकरी विद्यार्थी, प्रवासी, व प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्ण यांना सातत्याने त्रास होत असून सदर खड्डे तात्काळ बुजविण्यात येवून डांबरीकरण निकृष्ट करणाऱ्या कंत्राटदार यांना काळया यादीत टाकण्यात येऊन शाखा अभियंता व गुणवत्ता नियंत्रक यांच्या वर कारवाई करण्यासाठी रामदास कहाळे यांनी आडगाव राजा येथे 2सप्टेंबर पासून आमरण उपोषण सुरु केले आहे. राष्ट्रमाता जिजाऊंच्या जन्म स्थळा जवळील अवघ्या १३ किमी अंतरावर असलेल्या राजे लखोजीराव जाधव यांच्या ऐतिहासिक आडगाव राजा नगरीकडे जाणारा हा मार्ग दररोज शेकडो लोकांच्या प्रवासाचा आधार असून, आता मोठ्या खड्ड्यांमुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. बस वाहतूक, रुग्णांची ने-आण, शेकडो विद्यार्थ्यांचा प्रवास धोक्यात आडगाव राजा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने रुग्णांना तातडीने सिंदखेड राजा येथे हलवावे लागते. त्याचप्रमाणे शेकडो विद्यार्थी दररोज हाच मार्ग वापरून शिक्षणासाठी जातात. शासकीय बससेवा तसेच खाजगी बस वाहतूक देखील याच घाटावरून सुरु असते. या प्रचंड खड्ड्यांमुळे कोणत्याही क्षणी भीषण अपघात होण्याची शक्यता आहे. पर्यटकांसाठी धोका दायक रस्ता! आडगाव राजा हे विदर्भातील एकमेव भुईकोट किल्ल्या साठी तसेच प्राचीन हेमाडपंथी रेणुका देवी मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी दरवर्षी हजारो पर्यटक दाखल होतात. मात्र अशा पर्यटकांना आज खड्ड्यांनी भरलेला मार्ग आणि प्रशासनाचे नाकर्तेपण यांचा सामना करावा लागत आहे. निकृष्ट दर्जाच्या कामाचे बिंग फुटले! सावखेड तेजन नदीपासून घाटापर्यंत उन्हाळ्यात करण्यात आलेले डांबरीकरण पावसाळ्याच्या पहिल्याच सरींमध्ये उखडून निघाले आहे. काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने आज रस्ता खड्ड्यांनी विद्रूप झाला आहे. यासाठी जबाबदार असलेले शाखा अभियंता व गुणवत्ता नियंत्रक यांच्यावर तातडीने कारवाई करून त्यांच्या कडूनच या निकृष्ट कामाचा खर्च वसूल करण्याची मागणी रामदास कहाळे यांनी केली आहे एकंदरीत, ऐतिहासिक वारसा लाभलेली आडगाव राजा नगरी आज खड्ड्यांच्या विळख्यात सापडली असून नागरिक, रुग्ण, विद्यार्थी आणि पर्यटक यांच्या जिवाशी खेळले जात आहे. प्रशासनाने वेळीच लक्ष न दिल्यास या घाटातील खड्डे कोणत्याही क्षणी भीषण दुर्घटनेला आमंत्रण देतील आणि त्याची जबाबदारी थेट शासनावर राहील अशी मागणी रामदास कहाळे यांनी केली आहे. जर प्रशासनाने या खड्ड्यांत तातडीने दगड, मुरुम टाकून रस्त्याची डागडुजी केली नाही म्हणून 2 सप्टेंबर पासून आमरण उपोषनास रामदास कहाळे यांनी सुरवात केली आहे. माजी सभापती विठ्ठल राठोड, माजी जिप सदस्य भगवान आघाव , शिव सेना नेते विलास विघ्ने,यावेळी सुलजगाव चे सरपंच संतोष किंगारे, वडाळी चे सरपंच सूर्यकांत काकडे, रामेश्वर काकडे, किशोर काकडे, यांच्या सह आडगाव राजा येथील सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती .

# आंदोलनकर्त्यांच्या पाठीशी पुंगळा मराठा समाजाचा ठाम पाठिंबा मुंबईसाठी भाकरी, पाणी व साहित्याची मोठी मदत रवाना

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**



जिंतूर : तालुक्यातील पुंगळा येथील मराठा बांधवांनी मराठा आरक्षण आंदोलनाला भक्कम पाठिंबा देत मंगळवारी मोठ्या प्रमाणात अन्नधान्य व साहित्य मुंबईकडे रवाना केले.मुंबई येथील आझाद मैदानावर मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आमरण उपोषणास बसले असून लाखो आंदोलक त्यांना साथ देत आहेत. परंतु आंदोलकांना पाणी व अन्नाची गैरसोय निर्माण करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पुंगळा गावकऱ्यांनी ही मदत केली आहे.सकल मराठा समाजाच्या वतीने तब्बल ३ क्विंटल भाकरी, ५० किलो ठेसा, ३ क्विंटल फरसान - चिवडा, १,००० पाण्याच्या बाटल्या व २० बॉक्स बिस्कीट यांची व्यवस्था करून वाहनाद्वारे मुंबईकडे रवाना करण्यात आली. घोषणा देत हे वाहन उत्साहात निघाले. याशिवाय अनेक मराठा बांधव स्वतःच्या वाहनातून थेट मुंबई गाठण्यासाठी रवाना झाले आहेत.

# अप्पर पोलीस अधीक्षक गायकवाड यांच्या हस्ते श्रीं गणपती बाप्पा ची आरती

**सेवाशक्ती टाईम्स.**
**मुन्ना ठाकूर.**



देऊळगाव राजा : येथील बसस्थानक चौकात असलेल्या श्री छत्रपती संभाजी महाराज गणेश मंडळाला भेट देऊन अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांनी श्रींची आरती केली. सिंदखेडराजा उपविभागात श्री.गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड दौऱ्यावर असताना येथील छत्रपती संभाजी महाराज गणेश मंडळाला त्यांनी धावती भेट दिली. याप्रसंगी त्यांनी श्री ची मनोभावे आरती केली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, ठाणेदार ब्रह्मा गिरी,एपीआय आशिष रोही, वाईस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष मुशिरखान कोटकर, पत्रकार दयालसिंग बावरे,पत्रकार विजय जाधव,पत्रकार मुन्ना ठाकूर यांची उपस्थिती होती.या प्रसंगी मंडळाचे प्रेम हटकर, उपाध्यक्ष अमोल वाघमारे, सदस्य नागेश ठाकूर,वैभव पंडित,विशाल पवार, सागर भाग्यवत जोगिंदर सिंग बावरे,मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# ओबीसी आरक्षणात इतर समाजाची घुसखोरी रोखण्याची मागणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**





पाथरी : ओबीसी आरक्षणात इतर समाजाचा समावेश करून होत असलेली घुसखोरी रोखण्या साठी पाथरी तालुक्यातील सकल ओबीसी समाज बांधवांनी आज तहसीलदारांना निवेदन दिले. या प्रसंगी शेकडो मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंबईतील आझाद मैदानावर सुरु असलेल्या आंदोलनाच्या पार्श्व भूमीवर हे निवेदन देण्यात आले. यात सरकारने मराठा समाजाचा ओबीसी संवर्गात समावेश न करण्याची ठाम भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. यापूर्वीही राज्य मागासवर्ग आयोग व सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाज सामाजिकदृष्ट्या मागास नसल्याचे स्पष्ट करून त्यांचे आरक्षण नाकारलेले आहे, हे नमूद करण्यात आले. विशेषतः ओबीसी आंदोलन कर्ते प्रा. लक्ष्मणराव हाके, नवनाथ वाघमारे, अ‍ॅड. मंगेश ससाणे व इतर कार्यकर्त्यांवर झालेले प्राणघातक हल्ले पाहता, सरकारने तातडीने त्यांना सुरक्षा पुरवावी, अशी ठाम मागणी या निवेदनात करण्यात आली. तहसीलदार यांना हे निवेदन दिल्या नंतर पुढील दिशानिर्देश ठरवण्या साठी ओबीसी समाज बांधव एकत्र जमले. यावेळी भरत रामभाऊ हारकाळ, प्रल्हाद चिंचाणे, विष्णु उगले, मंचकरात हरकळ, सुखदेव चिंचाणे, रंगनाथ विरकर, गोविंद हरकळ, गोविंद चिंचाणे, युसुफुद्दीन अंसारी, विश्वनाथ थोरे, अजय थोरे, सुखदेव काका चिंचाणे, विजय विरकर अहमद अन्सारी, तुकाराम राठोड, भरत हरकळ यांच्यासह असंख्य मान्यवर उपस्थित होते. सकल ओबीसी समाजाने सरकारने या निवेदनाची गंभीर दखल घेऊन तातडीने कारवाई करावी; अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

**- निवेदनात प्रमुख मागण्या -**

**१. शिंदे समिती बरखास्त करावी.**
**२. शिंदे समितीने गोळा केलेल्या माहितीचे पुनः सर्वेक्षण व्हावे.**
**३. गेल्या दोन वर्षांत वाटण्यात आलेली बोगस कुणबी प्रमाणपत्रे रद्द करावीत.**
**४. संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबन व फौजदारी कारवाई व्हावी.**
**५. ओबीसी आंदोलनकर्त्यांवर झालेले प्राणघातक हल्ले लक्षात घेऊन त्यांना पोलीस संरक्षण द्यावे.**

# श्री सरस्वती विद्यालय दे.साकरशा येथील शिक्षक श्री पुरुषोत्तम चवरे SET परीक्षा उत्तीर्ण

**सेवाशक्ती टाईम्स.**
**नवल राठोड.**



देऊळगाव साखरशा : श्री सरस्वती विद्यालय दे साकर्शा येथील शिक्षक पुरुषोत्तम चवरे ह्यानी या वर्षी झालेल्या ४० व्या SET परीक्षेत ईतिहास या विषयात प्राविण्य मिळवुन सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरलेले आहेत.अतिशय कठीण आणि मानाची समजली जाणारी ही परीक्षा पुणे मंडळामार्फत महाराष्ट्र भर घेतल्या जाते. यावर्षी १५ जुन २०२५ ला या परीक्षेचे आयोजन राज्यभर करण्यात आलेले होते. या परीक्षेचा निकाल ३० ऑगस्ट ला लागला. या परीक्षेत पुरुषोत्तम चवरे यांनी शाळेचे अध्यापन सांभाळुन या परीक्षेचा अभ्यास करुन ईतिहास या विषयात SET पात्र ठरले. सोबतच मागील वर्षी मराठी या विषयात SET उत्तीर्ण झाले होते.. यामुळे त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.